**सं.फौ.ख.क्र.४५६७/२०२१**

**निशाणी ९**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानीः-**

**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**पुर्ण नांव** – आदित्य संजय खोब्रागडे,

**वय**– अंदाजे २५ वर्षे, **धंदा** –एनजीओ,

**रा.** नरसाळा, नागपूर.

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती ममता आवारीवार यांचेद्वारा शपथेवर सुरुः-**

एप्रिल २०२१ मध्ये मी मॅट्रीक्स वॉरीयर्स ऑरर्गनायझेशनचा अध्यक्ष होतो. आमची संस्था ही प्रोटेक्शन, ॲनीमल रेक्सू, सोशीयल वेलवेयर, एजुकेशन इत्यादी काम करते. दिनांक २९.०४.२०२१ रोजी रात्री ०८.०० वाजता यशवंत स्टेडीयमच्या मागे, संगमचाळ येथे झोपडपट्टी मध्ये घटना घडली होती. त्यावेळी आरोपी नामे विष्णु सहारे याने एका काळया श्वानाला लाकडी काठीने मारून नाल्यामध्ये टाकून दिले होते. वस्तीतल्या लोकांनी आम्हाला फोन करून सदर घटनेची माहिती दिली होती. आम्ही घटनास्थळी गेलो असता तिथे उपलब्ध असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये पाहिल्यावर सदर घटनेची माहितीची खात्री मिळाली. तसेच आम्ही वस्तीतल्या लोकांकडून आरोपीबाबत खात्री करून घेतली होती त्यानंतर पोलीसांना फोन करून बोलाविले होते. त्यानंतर पोलीस आले होते. सदर श्वानाला वस्तीतल्या लोकांनी नाल्यामधून बाहेर काढले होते व निळया ताळपत्रीवर ठेवले होते. त्यावेळी सदर श्वानाला जखमा झालेल्या होत्या. ज्या लाकडी दांडयाने त्याला मारले होते तो दांडा देखील तेथेच होता. पोलीसांनी सदरचा दांडा जप्त केला होता. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते. तसेच घटनेची माहिती दिली होती. पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले होते व श्वानाचे फोटो काढले होते. आता मला दोषारोपपत्रात दाखल असलेले दोन फोटो दाखविले. त्यामध्ये एक फोटो श्वानाचा आहे तर दुसरा सीसीटीव्ही फुटेजचा आहे. सदर दोन्ही फोटोला **आर्टीकल ए व बी** देण्यात आले. मी पोलीसांनी सदर घटनेबाबत रिपोर्ट दिला होता. आता मला माझा रिपोर्ट दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी १०** देण्यात आले. आता मला माझा प्रथम खबरी अहवाल दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ११** देण्यात आले. आरोपी दाखविला असता मी ओळखू शकेन. आज आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. मोहिले यांचेद्वारा.**

हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यावर पोलीसांनी माझी सही घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वस्तीतल्या लोकांकडून मला समजले होते की, लाकडी दांडा कोणता आहे. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल ए व बी वर पोलीसांनी माझी सही घेतली नव्हती. मी पोलीसांना रिपोर्ट देतेवेळेस वस्तीतल्या लोकांनी आम्हाला फोन करून सदर घटनेची माहिती दिली होती. आम्ही घटनास्थळी गेलो

असता तिथे उपलब्ध असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये पाहिल्यावर सदर घटनेची माहितीची खात्री मिळाली. तसेच आम्ही वस्तीतल्या लोकांकडून आरोपीबाबत खात्री करून घेतली होती. पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले होते व श्वानाचे फोटो काढले होते. सदर श्वानाला वस्तीतल्या लोकांनी नाल्यामधून बाहेर काढले होते व निळया ताळपत्रीवर ठेवले होते या बाबी सांगितल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, उपरोक्त बाबी माझ्या रिपोर्ट मध्ये नमूद केलेल्या नाहीत. त्या पोलीसांनी का नमूद केल्या नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही. घटनास्थळपाासून धंतोली पोलीस स्टेशन एक किलोमीटर अंतरावर आहे. मी दिनांक ३०.०४.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता घटनास्थळी गेलो होतो. त्यानंतर एक ते दोन तासांनी मी पोलीसांना रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरूध्द खोटा रिपोर्ट दिला होता. आमची संस्था ही एडेड आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आमच्या संस्थेला महिन्याला किंवा वर्षाला आमच्या संस्थेच्या धेय्यनुसार काम केल्याबाबत दाखवावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, जर आम्ही धेय्यप्रमाणे काम केले नाही तर आमचे संस्थेचे रजीस्ट्रेशन रद्द होवू शकते. हे म्हणणे खरे नाही की, आमची संस्था रद्द होवू नये म्हणून आरोपी विरूध्द खोटा रिपोर्ट दिला होता व खोटी केस केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

माझे सक्षम

श्रवणोत्तर स्वीकृत

RAHUL KESHAVRAO GAIKWAD

Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2025.04.03 12:45:45 +0530

(राहूल के. गायकवाड)

दिनांकः– ०२.०४.२०२५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.१),

नागपूर.